**मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेतंर्गत**
**अ-राज्यस्तरीय योजना**
**ब- जिल्हास्तरीय योजना व**
**क-जिल्हास्तरीय योजनांमध्ये सुधारणा करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांकः मत्स्यवि २०२५/प्र.क्र.५२(भाग-१)/पदुम-१३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- ०९ मार्च, २०२६

**वाचा:-**

१. आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाचा प्रस्ताव जा.क्र. मत्स्य /नि/१११२०६/०७/२०२४ (भाग-२)/३४०दि .१२/०९/२०२५.
२. आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाचा प्रस्ताव जा.क्र. मत्स्य/नि/१११२०६/२३/२०२५/४०४, दि.०८/०१/२०२६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील उपलब्ध जलक्षेत्रांचा विचार केला असता भूजलाशयीन क्षेत्राबरोबरच निमखारे पाणी व सागरी क्षेत्रामध्ये मत्स्यव्यवसायाकरीता मोठा वाव असून या नैसर्गिक स्त्रोतांचा वापर मत्स्यसंवर्धनासाठी उपयुक्त ठरणार आहे. भूजलाशयीन / निमखारेपाणी /सागरी क्षेत्राचा विविध योजनांर्गत विकास झाल्यास, मोठया प्रमाणात स्थानिक मच्छिमारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन त्यांची आर्थिक व सामाजिक उन्नती होण्यास मदत होईल.

राज्यात मत्स्यव्यवसाय क्षेत्रामध्ये शाश्वत विकासाद्वारे निलक्रांती घडविण्यासाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाकडून " मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना " अतंर्गत ६ राज्यस्तरीय व १९ जिल्हास्तरीय योजनांना तसेच सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या ३ जिल्हास्तरीय योजनांमध्ये सुधारणा करुन प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेचा मुख्य उद्देश शाश्वत पद्धतीने मत्स्योत्पादनात वाढ, मूल्यवर्धन, निर्यातमूल्य वाढ करणे, सरासरी उत्पादकता वाढविणे, मासेमारी नंतरचे होणारे नुकसान कमी करणे व मत्स्यआहाराचे प्रमाण वाढविणे तसेच मच्छीमार व मत्स्यकास्तकार यांचे उत्पन्न दुप्पट करणे व रोजगार निर्मितीसह त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणे हा आहे.

महाराष्ट्राने २०४७ पर्यंत "विकसित महाराष्ट्र-विकसित भारतासाठी" हे ध्येय निश्चित केले आहे. विभागाने प्रस्तावित केलेल्या योजना महाराष्ट्र-२०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंट मधील सामाजिक व आर्थिक परिणामांसह तपशीलवार कार्ययोजना तयार करणे, वित्तपुरवठा धोरण तयार करणे, चालू खर्चाची पुनर्रचना करणे, महसूल वाढविणे आणि पर्यायी भांडवलाचे स्रोत ओळखणे या मुद्यांशी संबंधित असून प्रस्तावित योजनांमार्फत विकसित महाराष्ट्र २०४७ चे उद्दिष्ट साध्य होण्यास प्रोत्साहन मिळेल व मच्छीमारांचे आर्थिक उत्पन्न वाढ होण्यास सहाय्य होईल.

"मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना" ही सर्वसमावेशक योजना म्हणून अंमलात आणली जात आहे. ज्यामध्ये अ) राज्यस्तरीय योजना, ब) जिल्हास्तरीय योजना व क) सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या जिल्हास्तरीय योजनांमध्ये सुधारणा याचा समावेश आहे.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयान्वये राज्य शासनाद्वारे मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेतंर्गत शाश्वत पद्धतीने मत्स्योत्पादनात वाढ, मूल्यवर्धन, निर्यातमूल्य वाढ करणे, सरासरी उत्पादकता वाढविणे, मासेमारी नंतरचे होणारे नुकसान कमी करणे व मत्स्यआहाराचे प्रमाण वाढविणे तसेच मच्छीमार व मत्स्यकास्तकार यांचे उत्पन्न दुप्पट करणे व रोजगार निर्मितीसह त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्याकरिता राज्यातील भूजलाशयीन, सागरी व निमखारे क्षेत्रातील खालील अ) राज्यस्तरीय योजना ब) जिल्हास्तरीय योजनांना व क) सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या जिल्हास्तरीय योजनांमध्ये सुधारणा करण्यास खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

**अ-राज्यस्तरीय योजना :-**

| अ. क्र. | योजनेचे नाव | प्रकल्प किंमत (रू. लक्ष) | अनुदान |
|---|---|---|---|
| १. | विभागीय स्तरावर प्रशिक्षण केंद्रांची स्थापना | १५००.०० | १००% |
| २. | आंतरराज्य अभ्यास दौरा | २.५० | १००% |
| ३. | पालिका तेथे मत्स्यबाजार (फिश मार्केट) स्थापना | वर्गवारीनुसार | ७५% राज्य शासन व २५ % स्थानिक स्वराज्य संस्था |
| ४. | निमखारे पाणी कोळंबी संवर्धनासाठी सुपर-इंटेन्सिव्ह पध्दतीने कोळंबी संवर्धन करणे | २५०.०० | ३०% |
| ५. | समुद्री शैवाळ बीज निर्मिती केंद्र (ब्रुड बँक) उभारणी करणे | १००.०० | १००% |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | मासळी उतरविण्याचे केंद्र, बंदरे व जेट्टीची दुरूस्ती | १२००.०० | १००% |

## ब) जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्रस्तावीत योजना

| अ. क्र. | योजनेचे नाव | प्रकल्प किंमत | अनुदान |
|---|---|---|---|
| १. | संस्थेकडे ठेक्याने असलेल्या मामा/जि.प /पाटबंधारे तलाव व लहान संगोपन व संवर्धन तलावांची दुरुस्ती, गाळ काढणे व पुनर्जिवन करणे | रु.२.०० लाख/हेक्टर | १००% |
| २. | माती व पाणी परिक्षण संच खरेदीवर अनुदान | रु.१.५० लक्ष | ५०% अराखीव प्रवर्ग/ ७५%राखीव प्रवर्ग |
| ३. | Paddle Wheel Aerator खरेदी | रु १.५० लाख. (५ हे. पर्यंत) | ५०% अराखीव प्रवर्ग / ७५% राखीव प्रवर्ग |
| ४. | मासे सुकविण्यासाठी सौर सयंत्र खरेदीवर अनुदान | रु.२५.०० लक्ष | ५०% संस्था/ २५% वैयक्तीक लाभार्थी |
| ५. | समुद्री शैवाळ संवर्धन | रु.२.०० लक्ष | ५०% अराखीव प्रवर्ग/ ७५% राखीव प्रवर्ग |
| ६. | अ. मत्स्यबीज संगोपन तलाव निर्मिती (२ हे. पर्यंत मर्यादित)<br>ब. निमखारे पाणी मत्स्यबीज संगोपन तलाव निर्मिती (२ हे. पर्यंत मर्यादित)<br>क. निमखारे पाणी कोळंबीबीज संगोपन तलाव निर्मिती (०.१५ हे. पर्यंत मर्यादित) | रु.८.००लक्ष<br>रु.८.००लक्ष<br>रु.१००.०० लक्ष | ५०% अराखीव प्रवर्ग/ ७५% राखीव प्रवर्ग<br>५०% अराखीव प्रवर्ग/ ७५% राखीव प्रवर्ग<br>३०% अराखीव प्रवर्ग/ ३५% राखीव प्रवर्ग |
| ७. | नवीन मत्स्यसंवर्धन तलाव बांधकाम व निविष्ठा अनुदान | रु.८.००लक्ष व रु.४.००लक्ष | ५०% अराखीव प्रवर्ग/ ७५% राखीव प्रवर्ग |
| ८. | मत्स्य संवर्धन अस्तित्वातील तळयास/तलावात पॉलीथीन अस्तरीकरण | रु.१२.००लक्ष | ५०% |
| ९. | बिगर यांत्रिक नौकांचे यांत्रिकीकरण | रु.१.५०लक्ष | ५०% अराखीव प्रवर्ग/ ७५% राखीव प्रवर्ग |
| १०. | सोलर शितपेटी (सोलर रेफ्रीजेरेटर) / ई -बाईकसह खरेदीसाठी अनुदान | रु.१.००लक्ष | ५०% अराखीव प्रवर्ग/ ७५% राखीव प्रवर्ग |
| ११. | किरकोळ मासळी विक्रेत्यांना साहित्य खरेदीवर अनुदान | रु.२५,०००/- | (५०% अराखीव/ ६०% राखीव) |
| १२. | जीव रक्षक उपकरणांवर अनुदान | रु.२०,०००/- | ५०% |

<table>
<tr><td>१३.</td><td colspan="2">इष्टतम मत्स्यबोटुकली संचयन योजना (सुधारीत) रु.३/- प्रति मत्स्यबोटुकली</td><td>इष्टतम संचयन शासन निर्णयानुसार</td><td>संस्थेस ५०% व खाजगी २५%</td></tr>
<tr><td>१४.</td><td colspan="2">फिरते मासे विक्री केंद्र (ई-रिक्षा विथ डिप फ्रिजर)</td><td>रु.३.५०लक्ष</td><td>५०% अराखीव प्रवर्ग/ ७५% राखीव प्रवर्ग</td></tr>
<tr><td>१५.</td><td colspan="2">नदी पुनर्भरण कार्यक्रम (River Ranching)</td><td>रु.१०.००लक्ष</td><td>१००%</td></tr>
<tr><td>१६.</td><td colspan="2">माशांच्या कचऱ्याचा पुनर्वापर प्रकल्प</td><td>२४.०० लक्ष</td><td>७५%राज्य शासन व २५% स्थानिक स्वराज्य संस्था</td></tr>
<tr><td>१७.</td><td colspan="2">मच्छिमार महिलांकरीता हॅण्डग्लोज व गमबुट उपलब्ध करून देण्याबाबत</td><td>रु.२५००/-</td><td>१००%</td></tr>
<tr><td>१८.</td><td colspan="2">सौरऊर्जा यंत्र उभारणी</td><td>रु.१०.०० लक्ष</td><td>५०% अराखीव प्रवर्ग/ ७५% राखीव प्रवर्ग</td></tr>
<tr><td rowspan="6">१९.</td><td rowspan="6">नविन बर्फ कारखाना उभारणे/ बर्फ कारखान्याचे आधुनिकीकरण (१० टन/२० टन/५० टन)</td><td>नवीन (१० टन)</td><td>४०.००</td><td rowspan="6">५०% अराखीव प्रवर्ग/ ५०% राखीव प्रवर्ग</td></tr>
<tr><td>आधुनिकीकरण (१० टन)</td><td>२०.००</td></tr>
<tr><td>नवीन (२० टन)</td><td>८०.००</td></tr>
<tr><td>आधुनिकीकरण (२० टन)</td><td>४०.००</td></tr>
<tr><td>नवीन (५० टन)</td><td>१५०.००</td></tr>
<tr><td>आधुनिकीकरण (५० टन)</td><td>७५.००</td></tr>
</table>

**क) जिल्हास्तरीय योजनांमध्ये सुधारणा**

| अ. क्र. | योजनेचे नाव | प्रकल्प किंमत (रु. लाख) | अनुदान |
|---|---|---|---|
| १. | तयार जाळी व बिगर यांत्रिक नौकांवर अनुदान (सुधारीत) | शासन निर्णयानुसार | (५०% अराखीव/ ७५% राखीव) |
| २. | मच्छीमार सहकारी संस्थांचा विकास | २.२५ (संस्था)<br>५.२५ (संघ) | व्यवस्थापकिय अनुदान व भागभांडवल कर्ज स्वरूपात |
| ३. | अ. मत्स्यबीज केंद्र बांधकाम/ दुरुस्ती/ आधुनिकीकरण (भांडवली)<br>ब. मत्स्यबीज केंद्र व्यवस्थापन व इतर (महसुली) | १०००.००<br>२००.०० | १००% राज्य हिस्सा |

अ) राज्यस्तरीय योजना

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाख) | अर्थसहाय्याचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | राखीव | अराखीव |
| १. | **निमखारे पाणी कोळंबी संवर्धनासाठी सुपर-इंटेन्सिव्ह पध्दतीने कोळंबी संवर्धन करणे** | **प्रति ०.५ हेक्टर** | २५०.०० | ३०% | ३०% |

महाराष्ट्रात मुंबई शहर व उपनगर वगळता उर्वरीत सागरी जिल्ह्यात प्रगत व शाश्वत कोळंबी संवर्धन प्रकल्प उभारणी. उत्पादन खर्च कमी करून नफा व उत्पादन क्षमता वाढवणे. स्थानिक तरुणांसाठी पर्यावरणपूरक उपजीविका उपलब्ध करून देण्याकरीता योजना करण्यात येत आहे. प्रति लाभार्थी ०.५ हे. मर्यादेत अनुदान देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

इच्छूक लाभार्थींनी जिल्ह्याच्या सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना अर्ज सादर करून योग्य मार्गाने मुख्य कार्यालयास सादर करावा.

**योजनेच्या अटी व शर्ती:-**

१. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज
२. प्रकल्प अहवाल
३. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड, छायाचित्र (फोटो)
४. लाभार्थ्यांचे बँकेचे विवरणपत्र
५. लाभार्थी स्वनिधी/ बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारस पत्र
६. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.
७. जागेची कागदपत्रे व नोंदणीकृत करारनामा.
८. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेमध्ये लाभ घेतलेला लाभार्थी सदर योजनेचा फायदा घेऊ शकणार नाही.
९. तटीय जलकृषी प्राधिकरण अंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक
१०. लाभार्थी राखीव प्रवर्गातील असल्यास, जात प्रमाणपत्र बंधनकारक
११. वयोमर्यादा १८-६० वर्षे
१२. अर्जदाराने प्रशिक्षण घेतलेले असावे किंवा घेणे बंधनकारक आहे.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाख) | अर्थसहाय्याचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | राज्य शासन | स्थानिक स्वराज्य संस्था |
| २. | **पालिका तेथे मत्स्यबाजार (फिश मार्केट) स्थापना** | **संख्या** | **वर्गवारी नुसार** | ७५% | २५% |

मासळी ही नाशवंत असल्याने तसेच बंदरावरून ग्राहकापर्यंत सुव्यवस्थित राहण्यासाठी तसेच एकाच ठिकाणी विक्री केंद्र झाल्यास व त्या ठिकाणी मासे साठविण्यासाठी सोई सुविधा उपलब्ध करून दिल्यास मासळीस योग्य भाव मिळून ग्राहकास चांगल्या दर्जाची मासळी उपलब्ध होऊ शकेल.

| अ.क्र. | वर्गवारी | प्रकल्प किंमत (रु. लाख) |
|---|---|---|
| १ | अ वर्ग महानगरपालिका | १५००.०० |
| २ | ब वर्ग महानगरपालिका | १२००.०० |
| ३ | क वर्ग महानगरपालिका | १०००.०० |
| ४ | ड वर्ग महानगरपालिका | ८००.०० |
| ५ | नगरपालिका सर्व वर्गवारी | ५००.०० |
| ६ | नगरपंचायत सर्व वर्गवारी | ३००.०० |
| ७ | ग्रामपंचायत सर्व वर्गवारी | ७५.०० |

**अटी व शर्ती**

१. अंमलबजावणी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेने सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावा. ज्यामध्ये खर्चाबाबतचा तपशील, मूलभूत सुविधा तसेच आवश्यक साधनसामग्री बाबतचे नियोजन तसेच रचनात्मक अहवाल, आवर्ती खर्च, निर्माण होणारा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपातील स्थानिक रोजगार व योजना अंमलबजावणी कालावधी इत्यादी बाबींचा तपशील समाविष्ट असावा.

२. राज्याची राजधानी / महानगरे इत्यादींना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

३. अंमलबजावणी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेने जागा उपलब्धते बाबतची कागदपत्रे, आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे/ परवानगी इत्यादी बाबतची कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

४. स्थापन करण्यात येणाऱ्या मासळी बाजाराचा आवर्ती खर्च, देखभाल खर्च तसेच बांधणी पश्चात व्यवस्थापनाचा खर्च हा सर्वस्वीपणे अंमलबजावणी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे करण्यात येईल व सदर मासळी बाजार अखंडीतरित्या चालू ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी सदर स्थानिक स्वराज्य संस्थेची असेल.

५. स्थापन करण्यात येणाऱ्या मासळी बाजाराच्या दर्शनी भागामध्ये अंतिम अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेने "सदर मासळीबाजार केंद्र हे मत्स्यव्यवसाय विभाग, पदुम, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत शासकीय अनुदानाद्वारे स्थापित करण्यात आले आहे", अशा आशयाचा फलक कायमस्वरूपी लावणे आवश्यक आहे.

६. सदर मासळी बाजारांमध्ये नियमित स्वच्छता राखणे, तसेच ग्राहकांना किफायतशीर दरामध्ये मासळी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सर्वस्वी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची असेल.

७. स्थापन करण्यात येणाऱ्या मासळी बाजारांमध्ये करण्यात येणारा रचनात्मक बदल, व्यवस्थापन तसेच मासळी मालाची गुणवत्ता राखणे बाबतचे नियोजन करताना सदर अंमलबजावणी करणारी संस्था शासकीय नियमांचे काटेकोरपणे पालन करून सदर केंद्राच्या विकासाबाबतची कार्यवाही करेल.

८. संबंधित अंमलबजावणी संस्थेने मासळी बाजारपेठ कार्यरत ठेवण्याकरीता त्याचे व्यवस्थापन यासाठी स्वयंचलित प्रणाली तयार करणे आवश्यक आहे.

९. माशांच्या कचऱ्याचा पुर्नवापर प्रकल्प उभारणी बंधनकारक आहे.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाख) | अर्थसहाय्याचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | | | | राज्य शासन |
| **३.** | **मासळी उतरविणारी केंद्र, बंदरे व** | **संख्या** | **१२००.००** | **१००%** |

| | जेट्टींची दुरुस्ती | | | |
|---|---|---|---|---|

महाराष्ट्र राज्याच्या सागरी किनारपट्टीवर मासळी उतरविण्याकरीता आवश्यक मुलभुत सुविधा जसे की, मासळी उतरविण्याचे केंद्रे, बंदरे व जेट्टी, उतरता धक्का, लहान पकटी, लिलावगृह, प्रसाधन गृह, मासळी सुकविण्याचा ओटा इत्यादी मुलभुत सुविधा मत्स्यव्यवसाय विभागाकरीता पुरविल्या जातात. सदरच्या स्थापत्य पायाभुत सुविधा निर्माण करणेसाठी करोडो रूपये खर्च केले जातात. सदरची बांधकामे स्थापत्य स्वरूपाची असल्याने काही वर्षानंतर (५ ते १० वर्षांनंतर) सदरचे बांधकाम जिर्ण होण्याची शक्यता असते त्यामुळे त्याची दुरूस्ती करणे आवश्यक असते. परंतू सदयस्थितीत मासळी उतरविण्याच्या केंद्रावर, बंदरावर व जेट्टीच्या दुरूस्तीसाठी कोणतीही योजना अस्तित्वात नाही. याकरीता सदरची योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. याकरीता रू.१२००.०० लक्ष प्रति वर्ष निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती**

१. कृषी व पदुम विभागाचे शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि-११२१/प्र.क्र.२४०/पदुम-१४, दि.१९/०४/२०२३ च्या शासन निर्णयात अनुज्ञेय असलेली सर्व कामांची दुरुस्त्या अनुज्ञेय राहतील.
२. लोकप्रतिनिधी/स्थानिक मच्छिमार संस्था/संघटना यांचेकडून प्राप्त झालेल्या निवेदनानुसार आवश्यक दुरुस्ती कामांचा प्राधान्यक्रम संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेकडून निश्चित करून आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयास मान्यतेसाठी सादर करतील.
३. एका पायाभूत सुविधांच्या दुरुस्ती कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१२.०० कोटीच्या मर्यादेत राहील.
४. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी प्रस्तावित केलेल्या पायाभूत सुविधांच्या दुरुस्ती कामांचे सविस्तर नकाशे/अंदाजपत्रके कार्यकारी अभियंता, आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय यांनी तयार करावेत व त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय हे तांत्रिक मान्यता देतील.
५. पायाभूत सुविधांच्या दुरुस्ती कामांचे नकाशे व अंदाजपत्रकास आयुक्त मत्स्यव्यवसाय हे प्रशासकीय मान्यता देतील.
६. प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची एक प्रत शासनास सादर करावी.
७. पायाभूत सुविधांच्या दुरुस्ती कामाबाबतचे पूर्ण वित्तीय अधिकार आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना असतील.
८. पायाभूत सुविधांच्या दुरूस्ती कामासाठी कार्यवरण यंत्रणा म्हणून आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई हे जबाबदार राहतील.
९. आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाने पायाभूत सुविधांच्या दुरुस्ती कामांचा प्रगती अहवाल प्रत्येक महिन्यास शासनास सादर करावा.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाख) | अर्थसहाय्याचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | | | | राज्य हिस्सा |
| ४. | **समुद्री शैवाळ बीज निर्मिती केंद्र (ब्रुड बँक) उभारणी करणे** | संख्या | १००.०० | १००% |

समुद्री शैवाळ बीज निर्मिती केंद्र स्थापन झाल्याने, समुद्री शैवाळ संवर्धनास चालना मिळेल. या योजनेमुळे समुद्री शैवाळची लागवड करुन त्यापासुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांची आर्थिक व

सामाजिक उन्नती होण्यास मदत होणार आहे. सदर प्रकल्प विभागामार्फत विकसित करण्यात येईल.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाख) | अर्थसहाय्याचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | | | | राज्य शासन |
| ५. | आंतरराज्य अभ्यास दौरा | १० लाभार्थी (प्रति दौरा) | २.५० (प्रति दौरा) | १००% |

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायिक मच्छिमार, शेतकरी यांच्याकरिता इतर राज्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाच्या अभ्यासाकरिता आंतरराज्य प्रशिक्षण दौरा आयोजित करता येऊ शकतो. पात्र प्रशिक्षण दौऱ्याकरीता प्रगतीशील मत्स्यकास्तकाराची निवड करून इतर मत्स्यव्यवसायात अग्रेसर असणाऱ्या राज्यात तसेच केंद्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय संशोधन संस्थांना भेटी देऊन मत्स्यव्यवसायातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास केल्यास त्याचा उपयोग करून जिल्ह्यातील मत्स्योत्पादनात भर होईल. प्रशिक्षण कार्यक्रम योजनेची प्रकल्प किंमत रु.२,५०,०००/- १० लाभार्थीकरिता प्रति दौरा अशी असेल. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज, आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो) जोडून सादर करणे बंधनकारक.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाख) | अर्थसहाय्याचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | | | | राज्य शासन |
| ६. | विभागीय स्तरावर प्रशिक्षण केंद्रांची स्थापना | संख्या | १५००.०० | १००% |

१. मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेतंर्गत राज्यातील मत्स्यव्यवसाय विभागीय स्तरावर ( प्रथम पुणे आणि नागपूर) प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याकरीता कार्यालय, प्रशिक्षण वर्ग, प्रयोगशाळा, ३० प्रशिक्षणार्थी/ ०५ विषय तज्ञ व अधिकारी यांचेसाठी सर्व सोयीयुक्त वसतिगृह (पुरुष व महिला करीता स्वतंत्र), प्रशिक्षण केंद्रास संरक्षक भिंत, विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा, प्रात्यक्षिक तलाव, बायोफ्लॉक टँक व तलाव, प्रयोगशाळेसाठी आवश्यक उपकरणे, फर्निचर, मुलभूत सुविधा निर्मिती, मत्स्यशेतीसाठी अवजारे व उपकरणे, दृकश्राव्य उपकरणे, वाहन व्यवस्था, परिरक्षण व आकस्मिक खर्च इत्यादी बाबींवरील खर्च समाविष्ट राहील.

२. वरीलप्रमाणे खर्च रु.१५००.०० लक्ष भांडवली खर्चास इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. प्रशिक्षण केंद्र स्थापनेसाठी विभागाकडील शासकीय मत्स्यबीज केंद्र येथील उपलब्ध जागा/उपयुक्त शासकीय जागा निश्चित करण्यात यावी.

४. सदर प्रकल्पासाठी आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य यांना प्रशिक्षण केंद्रासाठी अपेक्षित खर्चासाठी उक्त नमूद बाबीं व्यतिरिक्त इतर बाबी समविष्ट करण्याचा अधिकार राहील.

५. सदर प्रशिक्षण केंद्राचे प्रस्तावित कामांचे आराखडे व अंदाजपत्रके संबंधित जिल्ह्याचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून तयार करण्यात यावे व सक्षम प्राधिकारी यांनी

तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात यावी.सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याबाबत तसेच सदर प्रशिक्षण सभागृहाचे बांधकाम पूर्ण झाले असल्याबाबतची खात्री करुन आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सबंधित विभागाच्या प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्याकडे निधी वितरीत करावा.

६. सदर वितरीत निधीच्या अंतर्गत झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनाकडे सादर करण्याची कार्यवाही आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी.

**ब) जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्रस्तावीत योजना**

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान |
|---|---|---|---|---|
| १. | **संस्थेकडे ठेक्याने असलेल्या मामा/ जि.प./ पाटबंधारे तलावांची दुरुस्ती, गाळ काढणे व पुनर्जीवन करणे.** | **प्रति हेक्टरी (१०० हेक्टर पर्यंत)** | **२.००** | **१००%** |

**योजनेची कार्य पध्दती –**

सिंचन तलाव, जिल्हा परिषद तलाव, मामा तलावांची दुरुस्ती, गाळ काढणे व पुनर्जिवन करणे प्रति हेक्टर प्रकल्प किंमत रु.२.०० लाख (जलक्षेत्र १०० हे. पर्यंत)

१) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय संबंधित जिल्ह्यातील सिंचन तलाव व जिल्हा परिषद /जलसंधारण तलावांचा अभ्यास करून गाळ काढणी आवश्यक असलेल्या जलाशयांची यादी तयार करतील.

२) संबंधित सिंचन / जिल्हा परिषद विभागाचे कार्यकारी अभियंता हे सिंचन विभागाच्या WRD (Water Resource Department) दरनिहाय तांत्रिक अंदाजपत्रक तयार करतील. अंदाजपत्रक हे जलाशयाच्या तळातील स्तर (Bottom strata) लक्षात घेऊन तयार केले जाईल आणि त्यामुळे खर्च प्रत्येक जलाशयाप्रमाणे बदलू शकतो. अंदाजपत्रकाची वैधता महागाई दर वाढ विचारात घेवून १ वर्ष ठेवण्यात येईल. संबंधित सिंचन / जिल्हा परिषद, पाटबंधारे विभागाकडून कामाचे कंत्राट मंजूर करून गाळ काढणीची कामे हाती घेण्यात येतील. सर्व तांत्रिक पाहणी, मान्यता व तपासणी संबंधित विभागाकडून केली जाईल. संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्याकडे अंदाजपत्रकासह निधी मागणी प्रस्ताव सादर करावा.

३) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेकडून जिल्हा नियोजन समिती समक्ष कामाच्या अंदाजपत्रकानुसार निधी मागणी ठेवली जाईल. जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा वार्षिक अर्थसंकल्पानुसार मंजुरी देण्यात येईल. काम मंजूर झाल्यानंतर प्राप्त निधी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाकडे वितरित होईल. तेथून संबंधित तलावाची मालकी असलेल्या विभागाकडे (सिंचन / जिल्हा परिषद) प्राप्त निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे हस्तांतरित केले जातील.

४) या कामासाठीचे अंदाजपत्रक व निधी वाटप हे जलसंपदा विभागाच्या प्रचलित दरांनुसार राहील. खर्चाचे प्रमाण हे प्रत्येक जलाशयाच्या तळाच्या भूस्तर (bottom strata) नुसार बदलू शकते. कोणत्याही प्रकारची निश्चित आकडेवारी देण्याऐवजी काम पूर्णतः तांत्रिक दरपत्रकावर आधारित

असेल.

**योजनेच्या अटी व शर्ती:-**

१. संस्थेचा विहित नमुन्यातील अर्ज

२. प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रक व आराखडे

३. संस्थेच्या अध्यक्ष अथवा चेअरमनचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)

४. संस्थेचे बँकेचे विवरणपत्र

५. योजनेंतर्गत असल्यास कार्यालयीन आदेश, तलाव ठेका आदेश प्रत व करारनामा सदर योजना कार्यान्वित करण्याकरिता सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय संबंधित जिल्हा सक्षम अधिकारी राहतील.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अराखीव | राखीव |
| २. | **माती व पाणी परिक्षण संच खरेदीवर अनुदान ( ५ हेक्टर जलक्षेत्र पर्यंत)** | **संख्या** | **१.५०** | **५०%** | **७५%** |

भुजल/निमखारे कोळंबी/मत्स्य संवर्धन करण्यापुर्वी प्रकल्प जागेतील माती परिक्षण केल्यास अधिक उपयुक्त ठरते. तसेच संवर्धन कालावधीत पाण्याची गुणवत्ता आम्लता निर्देशांक (pH), ऑक्सिजन ($DO_२$), क्षारता (Salinity), अमोनिया (Ammonia), पाणी hardness इ. मापदंडची नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. प्रकल्पातील पाण्याची गुणवत्ता राखली गेल्यास, मत्स्योत्पादनात वाढ होण्यास मदत होईल तसेच पिक यशस्वीरीत्या घेणे शक्य होईल.

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज

२. वैयक्तिक/संस्था लाभार्थी.

३. प्रकल्प अहवाल

४. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)

५. लाभार्थ्यांचे बँकेचे विवरणपत्र

६. लाभार्थी स्वनिधी/ बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारसपत्र

७. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.

८. जागेची कागदपत्रे व नोंदणीकृत करारनामा.

९. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेमध्ये लाभ घेतलेला लाभार्थी सदर योजनेचा फायदा घेऊ शकणार नाही.

१०.प्रकल्प क्षेत्र किमान १ हे. इतके असावे

११.तटीय जलकृषी प्राधिकरण अंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक (लागु असल्यास)

१२.लाभार्थी राखीव प्रवर्गामधील असल्यास, जात प्रमाणपत्र बंधनकारक

१३.वयोमर्यादा १८-६० वर्षे
१४.अर्जदाराने प्रशिक्षण घेतलेले असावे किंवा घेणे बंधनकारक आहे.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अराखीव | राखीव |
| ३. | Paddle Wheel Aerator च्या खरेदीवर अनुदान (प्रति हेक्टरी ४ संच) | संख्या | १.५० | ५०% | ७५% |

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१.लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज
२. प्रकल्प अहवाल
३. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)
४. लाभार्थ्यांचे बँकेचे विवरणपत्र
५. लाभार्थी स्वनिधी/ बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारस पत्र
६. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.
७. जागेची कागदपत्रे व नोंदणीकृत करारनामा.
८. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेमध्ये लाभ घेतलेला लाभार्थी सदर योजनेचा फायदा घेऊ शकणार नाही.
९. प्रकल्प क्षेत्र किमान १ हे. इतके असावे
१०. तटीय जलकृषी प्राधिकरण अंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक (लागु असल्यास)
११. लाभार्थी राखीव प्रवर्गामधील असल्यास, जात प्रमाणपत्र बंधनकारक
१२. वयोमर्यादा १८-६० वर्षे
१३. अर्जदाराने प्रशिक्षण घेतलेले असावे किंवा घेणे बंधनकारक आहे.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | संस्था | वैयक्तिक |
| ४. | मासे सुकविण्यासाठी सौर सयंत्र खरेदीवर अनुदान (किमान १ टन क्षमता ) | संख्या | २५.०० | ५०% | २५% |

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

अ) सहकारी संस्था / FFPO / महीला बचत गट.
१. नोंदणीकृत सहकारी संस्था / FFPO / महीला बचत गट लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज.
२. जागा उपलब्धता पुरावा किंवा जागा भाडेकरार नोंदणीकृत
३. लाभार्थी संस्थेचे KYC कागदपत्रे, पॅनकार्ड, लेखापरीक्षण अहवाल, सभासद यादी इ.
४. सर्व सभासदांची NFDP व GAIS नोंदणी असणे आवश्यक
५. लाभार्थी संस्था स्वनिधी / बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे

शिफारस पत्र

६. यंत्र खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.

७. MNRE/ MEDA यांच्या तांत्रिक मोजमापे (Technical Specification) यांचा अवलंब करणे बंधनकारक राहील.

ब) वैयक्तीक लाभार्थी

१. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज

२. प्रकल्प अहवाल

३. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)

४. लाभार्थ्यांचे बँकेचे विवरणपत्र

५. लाभार्थी स्वनिधी / बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारस पत्र

६. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.

७. जागेची कागदपत्रे व नोंदणीकृत करारनामा.

८. वयोमर्यादा १८-६० वर्षे

९. MNRE/ MEDA यांच्या तांत्रिक मोजमापे (Technical Specification) यांचा अवलंब करणे बंधनकारक राहील.

सदर योजना कार्यान्वित करण्याकरिता जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय व कार्यकारी अभियंता मत्स्यव्यवसाय विभाग सक्षम अधिकारी राहतील.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अराखीव | राखीव |
| ५. | **समुद्री शैवाळ संवर्धन** | | | | |
| | **अ) २ x२ मी. चे ५ राफ्ट** | संख्या | ०.२५ | ५०% | ७५% |
| | **ब) २ x२ मी. चे १० राफ्ट** | संख्या | ०.५० | ५०% | ७५% |
| | **क) ट्युबनेट १० मी. लांबीचे २५ दोर (१ युनिट)** | संख्या | १.२५ | ५०% | ७५% |

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज

२. प्रकल्प अहवाल

३. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)

४. लाभार्थ्यांचे बँकेचे विवरणपत्र

५. लाभार्थी स्वनिधी/ बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारस पत्र

६. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.

७. जागेची कागदपत्रे व नोंदणीकृत करारनामा.

८. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेमध्ये लाभ घेतलेला लाभार्थी सदर योजनेचा फायदा घेऊ शकणार

नाही.

९. प्रकल्प राबविण्यासाठी संबधीत विभागाच्या परवानग्या /नाहरकत.

१०. तटीय जलकृषी प्राधिकरण अंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक(लागु असल्यास)

११. लाभार्थी राखीव प्रवर्गातील असल्यास, जात प्रमाणपत्र बंधनकारक

१२. वयोमर्यादा १८-६० वर्षे

१३. अर्जदाराने प्रशिक्षण घेतलेले असावे किंवा घेणे बंधनकारक आहे.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अराखीव | राखीव |
| ६. | अ. मत्स्यबीज संगोपन तलाव निर्मिती (२ हे. पर्यंत मर्यादित)<br>ब. निमखारे पाणी मत्स्यबीज संगोपन तलाव निर्मिती (२ हे. पर्यंत मर्यादित)<br>क. निमखारे पाणी कोळंबीबीज संगोपन तलाव निर्मिती (०.१५ हे. पर्यंत मर्यादित) | हेक्टर<br>हेक्टर<br>हेक्टर | ८.००<br>८.००<br>१००.०० | ५०%<br>५०%<br>३०% | ७५%<br>७५%<br>३५% |
| ७. | **नविन मत्स्यसंवर्धन तलाव बांधकाम व निविष्ठा अनुदान (२ हे. पर्यंत मर्यादित)** | हेक्टर | १२.०० | ५०% | ७५% |
| ८. | **मत्स्यसंवर्धन अस्तित्वातील तलावात पॉलीथीन अस्तरीकरण (२ हे. पर्यंत मर्यादित)** | हेक्टर | १२.०० (२ हे. पर्यंत मर्यादित) | ५०% | ५०% |

**योजनेची कार्यपध्दती:-**

१. मत्स्यबीज संगोपन तलाव निर्मीतीमध्ये भूजल मत्स्यबीज किंवा शोभिवंत मत्स्यबीज संगोपन करणे बंधनकारक राहील.

२. निमखारेपाणी मत्स्यबीज संगोपन तलाव निर्मीतीमध्ये जिताडा, बोयर, काळूंद्रा इ. माशांचे मत्स्यजिरे ते मत्स्यबोटुकली संगोपन करणे बंधनकारक राहील.

३. निमखारेपाणी कोळंबीबीज संगोपन तलाव निर्मीतीमध्ये कोळंबी इ. माशांचे नॉप्लीया(Nauplii) ते पीएल ३० (PL३०) संगोपन करणे बंधनकारक राहील. यामध्ये बंदिस्त शेड, सीमेंट टँक, पाणी शुद्धीकरण प्रणाली, एरेशन प्रणाली, जीवंत खाद्य तयार करण्याची प्रणाली, पंम्प सेट, प्रयोगशाळा इ. यंत्रणा उभारणी क्रमप्राप्त आहे.

**योजनेच्या अटी व शर्ती -**

१. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज

२. प्रकल्प अहवाल

३. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)

४. जागेची कागदपत्रे व नोंदणीकृत करारनामा

५. प्रकल्प राबविण्यासाठी संबंधित विभागाच्या परवानग्या/नाहरकत बंधनकारक
६. लाभार्थी राखीव प्रवर्गातील असल्यास जात प्रमाणपत्र बंधनकारक
७. लाभार्थ्यांचे बँकेचे विवरणपत्र
८. लाभार्थी स्वनिधी / बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारस पत्र
९. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.
१०. तटीय जलकृषी प्राधिकरण अंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक(लागु असल्यास)
११. सदर योजनेसाठी कुटुंबातील इतर व्यक्तींनी लाभ घेतलेला असल्यास लाभार्थी अपात्र ठरविण्यात येईल.
१२. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेमध्ये लाभ घेतलेला लाभार्थी सदर योजनेचा लाभ घेऊ शकणार नाही.
१३. अर्जदाराने प्रशिक्षण घेणे बंधनकारक राहील.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अराखीव | राखीव |
| **९.** | **बिगर यांत्रिक नौकांचे यांत्रिकीकरण** | **संख्या** | **१.५०** | **५०%** | **७५%** |
| **१०.** | **जीवरक्षक उपकरणांवर अनुदान (प्रति पारंपारिक नौकांकरिता)** | **संख्या** | **०.२०** | **५०%** | **५०%** |

**योजनेच्या अटी व शर्ती –**

१. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज
२. लाभार्थी क्रियाशील मच्छिमार असल्याचा व संस्थेचा सभासद असल्याचा दाखला
३. नौकेचा विधीग्राहय मासेमारी परवाना (सागरी क्षेत्र असल्यास)
४. विमा आवश्यक (सागरी क्षेत्र असल्यास)
५. इंजिन खरेदीचा लाभ अन्य योजनेतुन घेतलेला नसावा, बँकेचे पतपुरवठाचे हमीपत्र आवश्यक (अनुदानीत इंजिन पुढील १० वर्ष विकता येणार नाही)
६. आऊट बोर्ड इंजिन क्षमता जास्तीत जास्त १० HP पर्यंत आवश्यक आहे.
७. आऊट बोर्ड इंजिन खरेदी करून १० वर्ष झाली असल्यास व इंजिन बंद स्थितीत असल्यास तसेच इतर योजनेतून इंजिनसाठी अनुदान घेतले नसल्यास असे नौकाधारक यांना सदर योजनेचा लाभ देय राहील.
८. इनबोर्ड इंजिन १ ते २ सिलेंडर क्षमतेचे राहील.
९. इंजिन पावती GST बिल आवश्यक आहे.
१०. इंजिन करिता विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
११. नौकेवर इंजिन प्रस्तापित केल्यानंतर त्याची उचित नोंद जिल्हास्तरीय कार्यालयातील नोंद वहीत घेणे बंधनकारक
१२. सदर योजनेसाठी कुटुंबातील इतर व्यक्तींनी लाभ घेतलेला असल्यास लाभार्थी अपात्र ठरविण्यात येईल .

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अराखीव | राखीव |
| ११. | सोलर शितपेटी (सोलर रेफ्रीजेरेटर) ई-बाईकसह खरेदीसाठी अनुदान | संख्या | १.०० | ५०% | ७५% |
| १२. | किरकोळ मासळी विक्रेत्यांना खरेदीवर अनुदान | संख्या | ०.२५ | ५०% | ६०% |

**योजनेच्या अटी व शर्ती –**

१. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज

२. प्रकल्प अहवाल

३. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)

४. लाभार्थ्यांचे बँकेचे विवरणपत्र

५. लाभार्थी स्वनिधी/ बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारस पत्र

६. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.

७. सदर योजनेसाठी कुटुंबातील इतर व्यक्तींनी लाभ घेतलेला असल्यास लाभार्थी अपात्र ठरविण्यात येईल.

८. NETFISH/CIFT यांच्याकडून प्रमाणित संच घेणे बंधनकारक आहे.

९. लाभार्थीकडे विधीग्राह्य परवाना आवश्यक तसेच १० वर्षाकरीता अहस्तांतरणीय बंधनकारक.

१०. तसेच सोलर शितपेटी (सोलर रेफ्रीजेरेटर) ई-बाईकसह खरेदीसाठी MNRE/ MEDA यांच्या तांत्रिक मोजमापे (Technical Specification) यांचा अवलंब करणे बंधनकारक राहील.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | संस्था | खाजगी ठेकेदार |
| १३. | इष्टतम मत्स्य बोटुकली संचयन | संख्या | रू.३.०० प्रति बोटुकली | ५०% | २५% |

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१. संस्थेचा/लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज

२. प्रकल्प अहवाल

३. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड,पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)

४. संस्थेचा ठराव

५. संस्थेचे/लाभार्थ्यांचे बँकेचे विवरणपत्र

६. लाभार्थी/संस्था स्वनिधी/ बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारस पत्र

७. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.

८. सदर योजनेसाठी कुटुंबातील इतर व्यक्तींनी लाभ घेतलेला असल्यास लाभार्थी अपात्र ठरविण्यात

येईल

९. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेमध्ये लाभ घेतलेला लाभार्थी सदर योजनेचा फायदा घेऊ शकणार नाही.

१०.तलाव/जलाशय ठेका आदेश

११.प्रचलित तलाव ठेका शासन निर्णयानुसार इष्टतम मत्स्यबोटुकली संचयन करणे बंधनकारक राहील.

१२.मत्स्यबोटुकली मत्स्यव्यवसाय विभागाच्या शासकिय मत्स्यबीज उत्पादन/संवर्धन केंद्रातून खरेदी करणे बंधनकारक राहील. शासकिय केंद्रावर मत्स्यबोटुकली उपलब्ध नसल्यास संबंधित सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेकडून नाहरकत प्रमाणपत्र घेऊन राज्यातील प्रमाणिकरण केलेल्या खाजगी मत्स्यबीज केंद्रातून खरेदी करण्यात यावी.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात | शासकीय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अराखीव | राखीव |
| **१४.** | **फिरते मासे विक्री केंद्र (ई-रिक्षा विथ डिप फ्रिजर)** | **संख्या** | **३.५०** | **५०%** | **७५%** |

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१.लाभार्थ्याचा विहीत नमुन्यातील अर्ज

२. लाभार्थी ही १८ ते ६० वयोगटातील असावा.

३. लाभार्थ्यांना अनुदानातील लाभार्थ्यांचा हिस्सा पूर्ण करण्यासाठी आर्थिक स्रोतांच्या उपलब्धतेसह स्वनिधीत प्रकल्प प्रस्ताव सादर करावा. (प्रकल्प अहवाल)

४. लाभार्थी / वाहनचालक यांचा वाहन परवाना

५. लाभार्थीचे KYC कागदपत्र आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)

६. लाभार्थ्याचे बँकेचे विवरणपत्र

७. लाभार्थी स्वनिधी / बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारस पत्र

८. वाहन खरेदी पावती GST बील आवश्यक आहे.

९. लाभार्थ्यांनी सदर वाहन केवळ मासे विक्री तसेच संबंधीत मत्स्य पदार्थांच्या वाहतुकीसाठी वापरली जातील याबाबतचे हमीपत्र

१०. तसेच सदर वाहनांचा परवाना लाभार्थ्यांच्या नावाने अथवा संस्था असल्यास, संस्थांमधील सदस्यांचा असावा.

११. सदर योजनेअंतर्गत शासन अनुदान प्राप्त सात वर्षाच्या कालावधीकरीता इतर कोणत्याही व्यक्ती किंवा फर्मला हस्तांतरण करता येणार नाही.

१२. वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्रावर (RC Book) वर उपरोक्त योजनेअंतर्गत मंजुर अनुदानाची नोंद घेणे बंधनकारक राहिल.

१३. फिरते वाहनाचा/ ई-रिक्षाचा रंग पुरुष लाभार्थीकरीता (colour) हा निळा (Blue) व महिला लाभार्थीकरीता गुलाबी (Pink) असावा.

१४. याबाबीसाठी इतर योजनेमध्ये प्रस्ताव मंजूर असलेले लाभार्थी पात्र ठरणार नाही.

१५. ई-रिक्षा किमान ५ वर्षाकरीता अहस्तांतरणीय राहील.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान |
|---|---|---|---|---|
| १५. | नदी पुनर्भरण कार्यक्रम | संख्या | १०.०० (प्रती नदी) | १००% |

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

महाराष्ट्र राज्यात एकूण १०३ नद्या असुन त्यांचे क्षेत्र २३१८ चौ कि.मी आहे, या नद्यांमधील बारमाही नदी पुनर्भरण कार्यक्रम राज्य शासनामार्फत करण्यात येत आहे. ८०-१०० मिमि आकारमानाचे स्थानिक प्रजातीचे मत्स्यबोटुकली याप्रमाणे नदी पुनर्भरण कार्यक्रम जिल्हा पातळीवर राबविण्याचे असुन यामधुन मत्स्योत्पादनात वाढ होण्याबरोबरच स्थानिक मच्छीमारांना रोजगार निर्मिती होण्यास मदत होणार आहे. नदी पुनर्भरण कार्यक्रम (River Ranching) या योजनेअंतर्गत १००% लक्ष प्रति जिल्हा प्रति वर्ष योजना प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाख) | अर्थसहाय्याचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | राज्य शासन | स्थानिक स्वराज्य संस्था |
| १६. | माशांच्या कचऱ्याचा पुनर्वापर प्रकल्प | संख्या | २४.०० | ७५% | २५% |

जगभरात मासेमारीतून प्राप्त होणाऱ्या एकूण मत्स्य उत्पादनाच्या २५ ते ५०% इतका भाग कचऱ्याच्या स्वरूपात असतो. माशांचे, खेकड्यांचे व कोळंबीचे प्रक्रिया उद्योग व मासळी बाजारपेठेतून अनुक्रमे ३०-६०%, ७५-८५% व ४०-८०% कचरा निर्माण होतो. २०२० मध्ये जागतिक स्तरावर १५७ दशलक्ष टन मासळीचे उत्पादन मानव उपयोगासाठी वापरले गेले (FAO, २०२२), त्यातून सुमारे ६० दशलक्ष टन म्हणजेच ३८% कचरा निर्माण झाला. भारताचे २०२१-२२ मध्ये एकूण मासळी उत्पादन १६२.४८ लाख टन होते, ज्यातून ६० लाख टनांपेक्षा जास्त कचरा निर्माण झाल्याचे अंदाजित आहे. योग्य व्यवस्थापना अभावी हा कचरा पर्यावरणीय व आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊ शकतात. हा कचरा खत, मत्स्य/प्राणी खाद्य किंवा मत्स्यतळ्यात प्लवंग (Plankton) वाढीसाठी उपयोगात आणल्यास पर्यावरणीय प्रदूषण कमी होऊन शेती व मत्स्यसंवर्धनात उत्पादन वाढविता येते.

**अटी व शर्ती**

१. इच्छुक स्थानिक स्वराज्य संस्थांचा अर्ज व सहमतीचा ठराव.

२. बँकेचे विवरणपत्र

३. स्थानिक स्वराज्य संस्था स्वनिधी उभारणीबाबत संमतीपत्र.

४. प्रकल्प उभारणीसाठी साहीत्य खरेदी दरपत्रक व खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.

५. प्रकल्प राबविण्यासाठी संबंधित विभागाच्या परवानग्या /नाहरकत

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान |
|---|---|---|---|---|
| १७. | मच्छीमार महिलांकरिता हॅण्डग्लोज व गमबुट उपलब्ध करुन देणे | सागरी जिल्हा १००० लाभार्थी | ०.०२५ (प्रती लाभार्थी) | १००% |

मासे हे अत्यंत नाशवंत असून मासळी लवकरात लवकर hygienic पध्दतीने स्वच्छ करणे, निवडणे, त्यांची प्रतवारी करणे आवश्यक आहे. जेणेकरून मासळीला योग्य व वाजवी भाव मिळून अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणामध्ये हातभार लावणे शक्य होईल.

**योजनेच्या अटी शर्ती :**

१. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज
२. क्रियाशिल मच्छिमार असल्याबाबत संस्था/ ग्रा.पं/ संघ यांचा दाखला.
३. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)
४. NFDP व GAIS नोंदणी असणे आवश्यक
५. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.
६. वयोमर्यादा १८-६० वर्षे

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अराखीव | राखीव |
| **१८.** | **सौर ऊर्जा यंत्रणा उभारणी** | **संख्या** | **१०.००** | **५०%** | **७५%** |

कोळंबी/मत्स्य प्रकल्पात सुरळीतपणे संवर्धनासाठी प्रकल्प ठिकाणी पाणी पंप, एरेटर्स, लाईट सुविधा इ. पुरविण्याकामी विद्युत पुरवठा सुरळीत असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रकल्पासाठी पाणी नियमित कालावधीनंतर बदलणे किंवा प्रकल्पात नव्याने पाणी घेणे तसेच संवर्धन कालावधीत एरेटरचा वापर करणे यासर्व बाबींची कोळंबी/मत्स्य संवर्धनामध्ये महत्त्वाची भुमिका आहे. याकरीता प्रकल्पासाठी होणारा खर्च कमी करणे तसेच अखंडीत वीज पुरवठा होण्यासाठी विद्युत पुरवठयाबरोबर सौर उर्जेचा वापर केल्यास ते अधिक सोईस्कर ठरेल.

१. कोळंबी/मत्स्य प्रकल्प सौर उर्जेवर चालविण्यासाठी सौरउर्जा यंत्रणा उभारणी प्रकल्पाची प्रकल्प किंमत रु.१० लक्ष प्रति हे. १५ कि. वॅट क्षमतेचे १ संच प्रस्तावित असुन ५०% अराखीव प्रवर्ग/७५%राखीव प्रवर्ग
२. बायोफ्लॉक टाकी (७ टाकी, २५ टाकी व ५० टाकी) RAS प्रकल्प (१ टाकी, ६ टाकी व ८ टाकी) व बायोफ्लॉक पॉन्ड प्रकल्पासाठी (०.१० हे. व ०.२० हे.) करीता खालील मुद्दा क्र.६ मध्ये नमुद क्षमतेचे एक संच प्रस्तावित असुन, ५०% अराखीव प्रवर्ग/७५%राखीव प्रवर्ग प्रवर्गासाठी अनुदानाचे प्रमाण राहील.

अंदाजित किंमत -

१) रु.१०.०० लक्ष प्रति हे. १५ कि.वॅट क्षमतेचे १ संच (कोळंबी/मत्स्यसंवर्धन प्रकल्प)

| **२) बायोफ्लॉक टाकी (मोठे, मध्यम व लहान आकारमान)** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घटक | क्षमता (Kilo Watt) | किंमत (रु.लक्ष) | घटक | क्षमता (Kilo Watt ) | किंमत (रु. लक्ष) | घटक | क्षमता (Kilo Watt) | किंमत (रु. लक्ष) |
| ७ टाकी | ३ | २.३० | २५ टाकी | ५ | ४.०० | ५० टाकी | ७ | ५.०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३) RAS प्रकल्प | | | | | | | | |
| १ टाकी (१०० cub. mtr) | ०.७५ | १.०० | ६ टाकी (प्रति ३० cub. mtr) | ४.५० | ३.५० | ८ टाकी (प्रति ९० cub. mtr) | ७ | ५.०० |
| ४) बायोफ्लॉक पॉन्ड (मोठे, मध्यम व लहान आकारमान) | | | | | | | | |
| १० गुंठे | ३ | २.३० | २० गुंठे | ७ | ५.०० | - | - | - |

**अटी व शर्ती**

१. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज
२. प्रकल्प अहवाल
३. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)
४. लाभार्थ्यांचे बँकेचे विवरणपत्र
५. लाभार्थी स्वनिधी/ बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारस पत्र
६. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.
७. जागेची कागदपत्रे व नोंदणीकृत करारनामा
८. प्रकल्प क्षेत्र किमान १ हे. इतके असावे किंवा त्याप्रमाणात
९. उभारणीकरीता आवश्यक परवानगी
१०. लाभार्थी राखीव प्रवर्गामधील असल्यास, जात प्रमाणपत्र बंधनकारक
११. वयोमर्यादा १८-६० वर्षे
१२. अर्जदाराने प्रशिक्षण घेतलेले असावे किंवा घेणे बंधनकारक आहे.
१३. लाभार्थीने प्रकल्पाची नियमित देखभाल व दुरुस्ती करणे बंधनकारक राहील.
१४. प्रकल्पासाठी अखंडीत सौर ऊर्जा प्रकल्पातून वीज पुरवठा होणेसाठी बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टीम (Battery Energy Storage System) अथवा नेट मिटरींग सहित सौर विद्युत संच आस्थापित करणे बंधनकारक राहील.
१५. सदर सौर प्रकल्प MERC (महाराष्ट्र वीज नियामक आयोग) यांच्या प्रचलित विनियमानुसार आस्थापित करणे बंधनकारक राहील. तसेच MNRE/ MEDA यांच्या तांत्रिक मोजमापे (Technical Specification) यांचा अवलंब करणे बंधनकारक राहील.

| अ. क्र. | उपक्रमाचे नांव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अराखीव | राखीव |
| **१९.** | **नविन बर्फ कारखाना उभारणे/बर्फ** | **नवीन (१० टन)** | **४०.००** | **५०%** | **५०%** |
| | | **आधुनिकीकरण (१० टन)** | **२०.००** | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कारखान्याचे आधुनिकीकरण (१० टन/२० टन/५० टन) | नवीन (२० टन) | ८०.०० | | |
| | | आधुनिकीकरण (२० टन) | ४०.०० | | |
| | | नवीन (५० टन) | १५०.०० | | |
| | | आधुनिकीकरण (५० टन) | ७५.०० | | |

मासे खराब होऊ नयेत यासाठी बर्फ कारखान्यात बर्फ तयार करून मासे ताजे ठेवले जातात. यामुळे मासे बराच काळ टिकतात. मासे हे नाशिवंत असल्याने लवकर खराब होतात. परंतू बर्फाचा वापर केल्याने बॅक्टेरीयाचे प्रमाण कमी होऊन मासे जास्त वेळ टिकतात. मत्स्यव्यवसाय, कोल्ड-चेन व स्थानिक बाजारपेठेतील मागणी पूर्ण करण्यासाठी उच्च गुणवत्ता असलेला बर्फ उपलब्ध करून देण्यासाठी प्रति जिल्हा १ नवीन बर्फ़ कारखाना उभारणे आणि १ जुन्या बर्फ़ कारखान्याचे आधुनिकीकरण प्रति वर्ष योजना प्रस्तावित आहे

**अटी व शर्ती**

१. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज

२. प्रकल्प अहवाल

३. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)

४. लाभार्थ्यांचे बँकेचे विवरणपत्र

५. लाभार्थी स्वनिधी/बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारस पत्र

६. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.

७. जागेची कागदपत्रे व नोंदणीकृत करारनामा.

८. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेमध्ये लाभ घेतलेला लाभार्थी सदर योजनेचा लाभ घेऊ शकणार नाही.

९. संबंधित प्रशासकिय यंत्रणांकडून विविध परवानग्या.

१०. लाभार्थी अनु.जाती किंवा अनु.जमाती मधील असल्यास, जात वैधता प्रमाणपत्र

११. वयोमर्यादा १८-६० वर्षे

१२. जुन्या बर्फ कारखान्याचे आधुनिकीकरण करण्याकरीता जागेचे, इमारतीचे सर्व कागदपत्रे, विहीत परवानग्या, मागील तीन वर्षातील बर्फाचे उत्पादन व उत्पन्न याची माहीती, लेखापरीक्षण, ITR, इ. माहीती प्रकल्प अहवालासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**क) जिल्हास्तरीय योजनांमध्ये सुधारणा**

| अ. क्र. | योजनेचे नाव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान (रु. लाखात) | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अराखीव | राखीव |
| १. | तयार मासेमारी जाळी व | भूजल मत्स्यव्यवसाय | | ५०% | ७५% |
| | | तयार जाळी (३० किलो प्रति सभासद, @ रू.८००/- प्रति किलो) | ०.२४ | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | बिगर यांत्रीकी नौकावर अनुदान | नौका लाकडी | ०.६० | | | |
| | | नौका स्टील | ०.३० | | | |
| | | नौका फायबर | १.२० | | | |
| | | सागरी मत्स्यव्यवसाय | | | | |
| | | ३ टन वरील नौकांकरीता तयार जाळी (३०० किलो पर्यंत प्रति सभासद, @ रू.८००/- प्रति किलो) | २.४० | | | |
| | | ३ टन खालील नौकांकरीता तयार जाळी (१५० किलो पर्यंत प्रति सभासद, @ रू.८००/- प्रति किलो) | १.२० | | | |
| | | रापण मच्छीमार करीता तयार जाळी (६०किलो प्रति सभासद, @ रू.८००/- प्रति किलो) | ०.४८ | | | |
| | | नौका लाकडी/फायबर | ४.०० | | | |

तयार नायलॉन / मोनोफिलामेंट तयार जाळी खरेदीवर प्राति सभासद/वैयक्तिक मच्छीमारास जाळी व नौकांचा पुरवठा केल्यास मच्छीमार संस्थांच्या सभासदांना मासेमारीकरीता साधने उपलब्ध होऊन मासेमारी करणे सोपे होईल, हा या योजनेचा उद्देश आहे.

**भूजल मत्स्यव्यवसाय**-

जाळी: ३० किलो प्रति सभासद जाळी खरेदीवर अनुदान दर २ वर्षांनी

नौका: लाकडी - दर ५ वर्षांनी, पत्रा दर ५ वर्षांनी, फायबर - दर १० वर्षांनी

**सागरी मत्स्यव्यवसाय**- जाळीवर अनुदानः ३ टनावरील प्रत्येक मासेमारी नौकेस प्रति वर्षी ३०० किलो पर्यंत, ३ टनाखालील प्रत्येक मासेमारी नौकेस १५० किलो पर्यंत व रापण संघाच्या प्रत्येक सभासदास ६० किलो जाळीवरील खर्चाच्या रू.८००/-किलो यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान.

नौका: लाकडी - दर ५ वर्षांनी, पत्रा दर ५ वर्षांनी, फायबर - दर १० वर्षांनी

**सागरी मत्स्यव्यवसाय**- जाळीवर अनुदानः ३ टनावरील प्रत्येक मासेमारी नौकेस प्रति वर्षी ३०० किलो पर्यंत, ३ टनाखालील प्रत्येक मासेमारी नौकेस १५० किलो पर्यंत व रापण संघाच्या प्रत्येक सभासदास ६० किलो जाळीवरील खर्चाच्या रू.८००/-किलो यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान.

नौकावर अनुदानः १० टनापर्यंतच्या लाकडी/फायबर नौकांवर रू.४,००,०००/- खरेदी करणेसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल.

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१.लाभार्थी हा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचा सभासद अथवा वैयक्तिक क्रियाशील मच्छीमार असावा.

२. लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज

३. प्रकल्प अहवाल

४. लाभार्थीचे KYC कागदपत्रे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, छायाचित्र (फोटो)

५. लाभार्थ्यांचे बॅंकेचे विवरणपत्र

६. लाभार्थी स्वनिधी/ बॅंक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बॅंकेचे शिफारस

पत्र
७. खरेदी पावती GST बिल आवश्यक आहे.
८. सदर योजनेसाठी कुटुंबातील इतर व्यक्तींनी लाभ घेतलेला असल्यास लाभार्थी अपात्र ठरविण्यात येईल.
९. सागरी क्षेत्रातील लाभार्थींकरीता नौका नोंदणी, विधीग्राह्य मासेमारी परवाना, नौकेचा व खलाशी यांचा वैध विमा इ. कागदपत्रे बंधनकारक

| अ. क्र. | योजनेचे नाव | परिमाण | प्रकल्प किंमत (रु. लाखात) | शासकीय अनुदान |
|---|---|---|---|---|
| **२.** | **मच्छीमार सहकारी संस्थांचा विकास** | **संख्या** | **व्यवस्थापकीय अनुदान ०.२५<br>भागभांडवल २.०० (संस्था)<br>भागभांडवल ५.०० (संघ)** | **व्यवस्थापकिय अनुदान १००% व भागभांडवल कर्ज स्वरूपात** |

नविन नोंदणी झालेल्या यापुर्वी सदर योजनेचा लाभ न घेतलेल्या मच्छीमार सहकारी संस्थांच्या बळकटीकरणाकरीता ही योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत व्यवस्थापकीय अनुदान म्हणून प्रथम वर्षासाठी रु.२५,०००/- आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या जमा असलेल्या भागभांडवलाचे तीन पट रु.२,००,०००/- मर्यादेत तसेच जिल्हा संघास व्यवस्थापकीय अनुदान रु.२५,०००/- व जिल्हा संघांच्या जमा असलेल्या भागभांडवलाचे तीन पट रु.५,००,०००/- मर्यादेत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१. संस्थेचा विहित नमुन्यातील अर्ज व संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
२. प्रकल्प अहवाल
३. संस्थेचे KYC कागदपत्रे, पॅनकार्ड, सभासदांची यादी, अद्ययावत लेखापरिक्षण अहवाल.
४. संस्थेचे बँकेचे विवरणपत्र
५. संस्थेचे स्वनिधी/ बँक कर्ज उचल करुन योजनेचा लाभ घेत असल्यास संबंधित बँकेचे शिफारस पत्र
६. संस्थेचा ठरावाची प्रमाणित प्रत
७. सदर योजनेसाठी इतर योजनेचा लाभ घेतलेला असल्यास संस्था अपात्र ठरविण्यात येईल.
८. संस्थेचे प्रथम वर्षाचे लेखापरिक्षण झालेले असावे.
९. संस्थेने मत्स्यबीज संचयन केल्याचे नोंदी / पंचनामे करणे सभासदांनी मासेमारी केल्याच्या नोंदी ठेवणे.
१०. संस्थेला/संघाला देय भागभांडवलातून संस्था कोणत्या बाबीवर खर्च करणार या बाबतच्या प्रकल्प अहवालास सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेकडून मंजूरी घेणे बंधनकारक करणे
११. भागभांडवल द.सा.द.शे. १४% व्याज दराने अनुज्ञेय करावे.
१२. भागभांडवल परत फेड भागभांडवल मिळाल्याच्या दिनांकापासून ६ व्या वर्षी पासून समान ५ वार्षीक हप्त्यात परत करणे बंधनकारक राहील
१३. संस्थेने/संघाने भागभांडवल मिळण्यासाठी तारण म्हणून संस्थेच्या/संघाच्या पंचकमिटी सदस्याने / पदाधिकाऱ्यांनी (१० सदस्य) संस्थेकडे/संघाकडे ५ वर्षासाठी आपली स्वतःची अनामत रु.२०,०००/- ठेव ठेवावी. सदर ठेव रक्कम संस्थेच्या गंगाजळी / खात्यावर ठेवणे. सदर रक्कम सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे अनुमती शिवाय काढता येणार नाही व पंचकमिटी सदस्यास परत करता येणार नाही. संस्थेने शासकीय भागभांडवल परतफेड न केल्यास त्या रक्कमेतून शासकीय भागभांडवल

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वसूली करावी.<br>१४. मच्छीमार संस्थेस व्यवस्थापकीय अनुदान मंजूरीसाठी संस्थेने प्रशिक्षीत सचिव संबंधित जिल्ह्याच्या सहाय्यक निबंधक (दुग्ध) मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था यांच्या मान्यतेने नेमलेला असावा. | | | | |
| **अ. क्र.** | **योजनेचे नाव** | **परिमाण** | **प्रकल्प किंमत (रु. लाखात)** | **शासकीय अनुदान** |
| **३.** | **अ. मत्स्यबीज केंद्र बांधकाम/ दुरुस्ती/ आधुनिकीकरण (भांडवली)**<br>**ब. मत्स्यबीज केंद्र व्यवस्थापन व इतर (महसुली)** | **संख्या** | **१०००.००**<br>**२००.००** | **१००%**<br>**१००%** |
| अ. मत्स्यबीज केंद्र हे जुनी असल्याचे केंद्रातील वर्तुळाकार चायनिज /इतर मत्स्यप्रजातींच्या आवश्यकतेनुसार हॅचरी संच, पाण्याची टाकी, संगोपन/ संवर्धन तलाव, पाईपलाइन, केंद्राचे कुंपण इ. करीता रु.१०००.०० लक्ष प्रति केंद्र<br>ब. केंद्रामधील तलावांचे व्यवस्थापन करण्यासाठी लागणारे साहित्य व सामुग्री, प्रजनक साठा मत्स्यखाद्य, संप्रेरके, तलाव व्यवस्थापन करीता लागणारे खत, रासायनिक द्रव्ये, जाळे, हापा, मजुरी, सामुग्री पुरवठा इ. करीता रु.२००.०० लक्ष प्रति केंद्र<br>सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय हे मत्स्यबीज केंद्रातील दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव जलसंपदा/बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडे अंदाजपत्रक व आराखडा तयार करणेकरीता सादर करतील.<br>जलसंपदा/बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता हे अंदाजपत्रक व आराखडा तयार करुन संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना सादर करतील.<br>सदर प्रस्ताव तांत्रिक मान्यतेस्तव आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना सादर करतील. तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर निधी उपलब्धतेसाठी संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय हे प्रस्ताव जिल्हा नियोजन विभागाकडे सादर करतील.<br>निधी प्राप्त झाल्यानंतर जलसंपदा/बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडुन काम केंद्राचे बांधकाम /दुरुस्ती/ आधुनिकीकरण करण्यात येईल.<br>सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी महसुली खर्चाकरीता आवश्यकतेनुसार तांत्रिक मान्यता व निधी प्राप्त झाल्यानंतर निधीचा विनियोग सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय करतील. | | | | |

मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेतंर्गत राज्यस्तरीय योजनांचा खर्च विभागाचे उपलब्ध लेखाशिर्ष व आवश्यकतेनुसार नवीन लेखाशिर्ष निर्माण करुन भागविण्यात यावा. जिल्हास्तरीय योजनांचा खर्च जिल्हास्तरीय योजनांसाठी असणाऱ्या लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय दिनांक २२/०२/२०२६ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयास अनुसरुन तसेच नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.०४/का.१४३१ दिनांक १३/०१/२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र. ०३/१४८१ दिनांक १४/०१/२०२६, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या, अनौपचारिक संदर्भ क्र.०६/२०२६/अर्थसंकल्प,

दि.०२/०२/२०२६, आदिवासी विकास अनौपचारिक संदर्भ क्र. ०६/२०२६/कार्यासन-९, दिनांक ०२/०२/२०२६, ऊर्जा विभागाच्या ई-ऑफिस क्र. १५३६२२४ / नोट # १०, दिनांक ०४/०२/२०२६ तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७/२०२६/व्यय-२, दि.२२/०१/२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र. ३४/२०२६/व्यय-२, दिनांक २३/०१/२०२६ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२६०३०९१७०६३८५७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

JAKHATE KISHOR MAHADEO


Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fisheries Department, 2.5.4.20=83112E1445917D0A21FBAB36D7C0FF41E09863C93A2E62EA1B0C01DA16B7A161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2026.03.09 18:00:04 +05'30'


**(कि.म.जकाते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव
५) मा. मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव
६) सर्व मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मुंबई
८) अप्पर मुख्य सचिव, (नियोजन), मंत्रालय,मुंबई
९) अप्पर मुख्य सचिव, (वित्त), मंत्रालय, मुंबई
१०) अप्पर मुख्य सचिव, (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,मुंबई
१२) सचिव, आदिवासी विकास विभाग ,मंत्रालय, मुंबई.
१३) सचिव (पदुम), मंत्रालय,मुंबई
१४) आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,मुंबई
१५) सर्व जिल्हाधिकारी/जिल्हा नियोजन अधिकारी
१६) व्यवस्थापकिय संचालक महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मुबई
१७) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८) प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ लातूर/ अमरावती/नागपूर
१९) सर्व सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय

२०) महालेखापाल १/२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा),मुंबई/नागपूर
२१) अधिदान व लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
२२) निवासी लेखा अधिकारी, मुंबई
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२४) सर्व उपकोषागार अधिकारी
२५) सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नविन प्रशासन भवन, ५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई
२६) कक्ष अधिकारी पदुम-१२/१४
२७) निवडनस्ती पदुम १३